
# आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाचा सामाजिक, आर्थिक स्थिती विषयक अभ्यासाचा अहवाल



**आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र**

**घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे – ४१२४०८**

**आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाचा सामाजिक, आर्थिक स्थिती विषयक अभ्यासाचा अहवाल**

Ambegaon Talukyatil Thakar Samajacha Samajik Arthik Sthiti Vishayak Abhyasacha Ahaval

© आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र

**लेखक**
**किरण लोहकरे** (संशोधक, आदिम संस्था, पुणे)
**प्रा. स्नेहल साबळे** (संशोधक)

**प्रकाशक**
आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र
ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१० ५०९
मो. ९४०४२३८७७३

**मुद्रण**
रेवंथ प्रिंटर्स
९१४ सदाशिव पेठ, पुणे

**मुद्रित शोधन**
समीर गारे
मो. ९१६८१९२८२३

**किंमत**
रु. २०/-

# अनुक्रमणिका


**प्रास्ताविक** १

**अभ्यासाची पार्श्वभूमी** २

- अभ्यासाची उद्दिष्ट्ये
- संशोधन प्रश्न
- तथ्य संकलनाचे स्रोत
- अभ्यासाची पद्धती
- संशोधन आराखडा
- नमूना निवडीची पद्धती
- तथ्य विश्लेषणाची पद्धती

**ठाकर समाजाची सर्वसाधारण माहिती** ६

- समाजाचे मूळ वस्तीस्थान
- महाराष्ट्रातील अधिवास

ठाकर जमातीसाठी क्षेत्र बंधन संपुष्टात आणणारा संसदेचा सुधारित कायदा नंबर १०८/७६

ठाकर समाजाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये

**आंबेगाव तालुक्याची भौगोलिक माहिती** १०

- लोकसंख्या
- शिक्षण

**प्रमुख व्यवसाय** १४

- शेतमजुरी
- शेती
- वाट्याने शेती करणे
- पशुपालन

**ठाकर समाजाची सामाजिक आर्थिक माहिती** १७

- निवारा (घराची व घराच्या खालच्या जमिनीची मालकी)
- जमिनीची मालकी व जमीन धारणा क्षेत्रानुसार वर्गवारी
- सरासरी मासिक उत्पन्न
- घरातील प्रमुख कागदपत्रांची उपलब्धता

**मूलभूत सुविधा बाबतच्या समस्या** २३

**प्रमुख निरीक्षणे व सूचना** २४

# विशेष आभार

**मार्गदर्शक**

- डॉ. भौमिक देशमुख (सेवानिवृत्त प्राध्यापक, सावित्रीबाई फुले,पुणे विद्यापीठ,पुणे)
- प्रा. केतकी गोखले (कर्वे समाज सेवा संस्था,पुणे)

**अभ्यास प्रकल्पाचे समन्वयक**

- प्रा. डॉ.हनुमंत भवारी
- प्रा. युवराज काळे
- अविनाश गवारी
- अनिल सुपे
- आकाश पारधी
- डॉ. अमोल वाघमारे
- राजेंद्र घोडे
- समीर गारे
- सागर पारधी

**अभ्यास प्रकल्पातील तथ्य संकलन सहभागी सदस्य**

- नेहा बांबळे
- आशा लोहकरे
- संचिता खेबडे
- अंकिता ढमढेरे
- निकिता गायकवाड
- स्नेहल साबळे
- अनुजा असवले
- अभीजीत घोडेकर
- महेश गाडेकर

**विशेष सहकार्य**

- अर्जुन काळे
- धनेश पारधी (वाहन चालक)

## प्रास्ताविक

आदिम संस्कृती अभ्यास संशोधन व मानव विकास केंद्र,ही संस्था आदिवासी,दलित व वंचित घटकांच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कटिबद्ध असणारी संस्था आहे.संशोधन व अभ्यास याआधारे, या वंचित घटकांच्या विकासप्रक्रियेत सकारात्मक हस्तक्षेप संस्था करत आहे.या अनुषंगाने विविध उपक्रम, छोटे अभ्यास संस्था सातत्याने राबवित असते. संस्थेच्या वतीने, सन-२०१२ पासून विविध रचनात्मक कार्यक्रम व संशोधनपर प्रकल्प, पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात आयोजित केले जातात. याचाच एक भाग म्हणजे,. आदिवासी ठाकर समाजाचा हा सामाजिक,आर्थिक अंगाने केलेला संशोधनपर अभ्यास होय.

आदिवासी समुदायातील ठाकर समाजाचे जगणे हे अलीकडील काळात अत्यंत कठीण झालेले आहे.विशेषत:त्यांच्या राहण्याचे व त्यांच्या जमिनीचे प्रश्न हे आजच्या काळात अत्यंत कळीचे झालेले आहेत. आदिवासी ठाकर समाजाचे वास्तव्य हे मुख्यत आंबेगाव तालुक्याच्या, आदिवासी भागात नसून बिगर आदिवासी क्षेत्रात आहे.अनेक वर्षापूर्वी ही  कुटुंबे तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकरी,जमीनदार यांच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करण्यासाठी येथे स्थायिक झालेली आहेत. ही कुटुंबे, डोंगराच्या बाजूला झोपडी किंवा कच्चे मातीचे घर बांधून वर्षानुवर्ष राहत आहे. येथे पाणी, वीज,शौचालय,रस्ता,शाळा या मुलभूत सुविधाही उपलबद्ध नसतात व सगळ्यात महत्वाचे म्हणजे राहत असलेल्या घराखालची जमीन ही त्यांच्या नावे नसते, अलीकडील काळात स्थानिक शेतकरी व कित्येक पिढ्यांपासून वास्तव्यास असलेला आदिवासी ठाकर समाज यांचे जमिनीच्या मालकीवरून सबंध कमालीचे ताणले गेले आहेत.

या कळीच्या प्रश्नाबरोबरच या समाजाच्या इतर ही मुलभूत प्रश्नांचे खरेखुरे स्वरूप समोर यावे व त्यानुसार आदिवासी ठाकर समाजाच्या प्रश्नांची उकल व त्याची सोडवणूक करण्यासाठी हा अभ्यास अत्यंत महत्वपूर्ण आहे.

पावसात व भूक-तहान हरपून, आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाच्या वस्त्या फिरून हा अभ्यास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, स्वयंसेवी वृत्तीने ज्या युवक-युवतीने सहकार्य केले, त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. हा अभ्यास प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ज्या संस्था,संघटना यांनी सहकार्य केले त्यांचे ही विशेष आभार.या अहवालाचे लेखक व छपाईसाठी मदत करणारे देणगीदार असे सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

आदिवासी ठाकर समाजाच्या मुलभूत प्रश्नाचे वास्तव समोर आणणारा हा संशोधन अभ्यास या पुस्तिकेच्या माध्यमातून आज प्रकाशित होत आहे. हा अहवाल व या अहवालातून समोर आलेली आव्हाने आपण सर्वांनी मिळून तडीस नेणे गरजेचे आहे. पुढील काळात या अहवालातून समोर आलेल्या आदिवासी ठाकर समाजाच्या कळीच्या व मुलभूत अशा प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण सारे प्रयत्न करूयात या विश्वासासह...!

– आदिम संस्था, कार्यकारी मंडळ

## अभ्यासाची पार्श्वभूमी

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींपैकी 'ठाकर' जमात ही एक आहे. आदिवासी जमातींमधील मागास, अप्रगत म्हणून गणल्या जाणाऱ्या जमातीं-मधील ही एक जमात आहे. आजही शहरांच्या झगमगत्या जगापासून दूर डोंगर दऱ्यात वास्तव्य करून हि जमात राहते. ही आदिवासी ठाकर जमात आजही अनेक क्षेत्रात पिछाडीवर आहे. महाराष्ट्रातील ठाकर जमातीची वस्ती ही प्रामुख्याने ठाणे, पालघर, रायगड, अहमदनगर, पुणे, नाशिक या जिल्ह्यांमध्ये आढळून येते. ठाकर जमातींच्या लोकांची वस्ती मुख्य गावापासून दूर डोंगराच्या कुशीमध्ये असते. आदिवासी ठाकर जमातीचे राहणीमान इतर जमातींच्या लोकांपेक्षा वेगळे आहे. हे निसर्गाशी एकरुप झाल्यामुळे आनंदात जगतात. निसर्गातील विविध झाडांची, नद्यांची, पर्वताची, प्राण्यांची व पक्षांची त्यांना अधिक माहिती आहे. जंगलामध्ये राहणारी ठाकर जमातीची घरे मेहडीची, गवताची व त्यांना कारव्याच्या भिंती असलेली असतात. ठाकर जमातीतील लोक निसर्गातील झाडाची तोड करत नाहीत. खऱ्या अर्थाने जंगलाचे रक्षण हे आदिवासी करतात. जंगलातील कंदमुळे, फळे , रानभाज्या व औषधी वनस्पतींची यांची त्यांना चांगली जाण आहे. कोणत्या ऋतूमध्ये कोणती फळे, कंदमुळे येतात. कोणती फळे, कंदमुळे, रानभाज्या खाव्यात हे त्यांना त्यांच्या अनुभवावरुन कळते. आजारपणात रुग्णांना झाडपाल्याचे (वनौषधी) औषध देणाऱ्या अनेक व्यक्ति ठाकर समाजात आढळून येतात.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पश्चिम व पुर्व भाग येथे या जमातींचे वास्तव्य आहे. हा समाज सरकारच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक धोरणांपासून आजतागायत वंचितच राहिला आहे. आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाच्या सद्यस्थितीचे वास्तव अत्यंत भीषण स्वरूपाच आहे. हा समाज ज्या ठिकाणी राहतो, तेथील राहत घर त्यांच्या नावावर आहे. पण घराखालची जमीन त्यांच्या नावावर नाही. तर काही ठिकाणी घर हि नाही आणि जमीनही नाही, अशी अवस्था आहे. या

ठाकर वस्तीतील अशी अनेक कुटुंबे ही इतर समाजाच्या जमिनीवर वर्षानुवर्षेवस्ती करून राहत आलेली आहेत. अनेकांची सरकार दरबारी कोणतीच नोंद नाही. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत दप्तरी देखील अनेकांची नोंद आढळून येत नाही. ठाकर समाजाच्या मूळ प्रश्नांची आणि त्याच्या समस्यांची अधिक सखोलपणे उकल व्हावी, त्यांच्या प्रश्नांचे वास्तव स्वरूप समोर येऊन या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने हा अभ्यास प्रकल्प आम्ही हाती घेतला होता.

प्रस्तुत संशोधनात आदिवासी ठाकर जमातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करून, त्यांच्या विविध समस्या, त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्याचा अभ्यास करणे, तसेच या समस्यांवर , प्रश्नावर काय उपाययोजना करता येतील हे सुचविणे. त्यासोबतच या आदिवासी ठाकर जमातीच्या नागरिकांना शासकिय योजनांचा लाभ का मिळत नाही ? याची कारणे शोधणे व त्यावर उपाय सुचविणे हा होता. या संशोधनामुळे पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील आदिवासी ठाकर जमातीची स्थिती सुधारण्यास निश्चितपणे उपयोग होईल. त्याशिवाय सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, शासन आणि ठाकर जमातीसारख्या इतर आदिवासी जमातीवर संशोधन करणाऱ्या संशोधकांना ही या संशोधनाचा निश्चितच उपयोग होईल.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

१) आंबेगाव तालुक्यातील आदिवासी ठाकर जमातीचे सामाजिक, आर्थिक समाज जीवनाचा अभ्यास करणे.

२) ठाकर जमातीचा शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) आदिवासींच्या विकासासाठी शासकीय योजना आणि त्यांची फलनिष्पतीचा अभ्यास करणे.

४) ठाकर जमातीच्या समस्यांचा अभ्यास करून शासनाला

त्यांच्यासाठी धोरणे राबविण्यासाठी उपयोगी पडेल अशी माहिती संकलित करणे .

**संशोधन प्रश्न**

१) आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाची सामाजिक–आर्थिक, स्थिती कशी आहे ?

२) आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाची शैक्षणिक स्थिती कशी आहे?

३) आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाला मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत का ?

४) आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाला शासकीय योजनांचा लाम मिळतो का ?

५) आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाच्या समस्या काय आहेत ?

**तथ्य संकलनाचे स्रोत**

**प्राथमिक** – तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची चा वापर तयार करण्यात आला आहे.

**दुय्यम** – विविध संशोधन अहवाल, पुस्तके इ चा वापर दुय्यम तथ्य संकलनासाठी केला गेला आहे.

**अभ्यासाची पद्धती**

**संशोधन आराखडा**


सदर अभ्यासात वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. ठाकर समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीचे वर्णन या अभ्यासातून केले आहे. ठाकर जमातीच्या लोकांची सध्याची शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थिती मांडण्याचा प्रयत्न यामधून करण्यात आला आहे. विविध शासकीय योजनांचा झालेल्या लाभांविषयीची माहिती या अभ्यासायाद्वारे गोळा केली आहे.

## नमूना निवडीची पद्धती

सदर संशोधनात प्रत्येक एककाला निवडीची समान संधी असून संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील साध्या यादृच्छिक नमुना निवड पद्धती चा वापर करण्यात आला आहे. आंबेगाव तालुक्यातील खालील १३ गावांमधील ठाकर वस्त्यांमधील २९८ कुटुंबाची सर्वेक्षणासाठी निवड केली असून त्याचा अभ्यास केला गेला आहे.

## तथ्य विश्लेषणाची पद्धती

तथ्य गोळा केल्यानंतर त्यांचे एकल व द्विचल सारणीच्या माध्यमातून विश्लेषण केले आहे. यासाठी एक्सल, एसपीएसएस या सॉफ्टवेअर चा वापर केला गेला आहे.




१.१ अभ्यासासाठी निवडलेली १३ गावे

# ठाकर समाजाची सर्वसाधारण माहिती

## समाजाचे मूळ वस्तीस्थान

ठाकर समाजाच्या मूळ वस्तीस्थानाबाबत वेगवेगळे मतमतांतरे आहेत. काही संशोधना अहवालातील संदर्भानुसार ठाकर समाज हा उत्तरेकडून कोकणात आला व नंतर इतरत्र पसरला. इगतपुरी येथे एका ठाकर समाजाच्या व्यक्ती जवळ सापडलेल्या पुरातन लेखावरून सातव्या शतकाच्या पूर्वार्धात ठाकर समाज नाशिक जिल्ह्यात वस्ती करून रहात होता. संशोधक जॉन विलसन यांच्या मते ठाकर समाजाचे मूळ वस्तीस्थान गुजरात हे होते व तेथील राजा सुलतान महमुद बेगडा (इ. स. १४५९ – १५११ ) यांच्या छळाला कंटाळून त्यांनी जंगलात निघून जाणे पसंत केले. त्यावेळी इतर हिंदू समाज व ठाकर समाज यांची सांस्कृतिक सरमिसळ झाली व आजची ठाकर नावाची जमात उत्तर भागात पसरली. ना. बा. रणसिंग यांच्या अनुसार ठाकर समाज हा मुळतः राजस्थान येथे वास्तव्यास होता परंतु मोगलांच्या अतिक्रमणानंतर त्यांनी महाराष्ट्रात स्थलांतर केले. तर ना. गो. चाफेकरांच्या एका सिद्धांतानुसार ठाकर समाजाची मूळ स्थान नाशिक हे आहे कारण त्यांच्या देव–देवता प्रामुख्याने नाशिक जिल्ह्यामध्ये आढळून येतात.

ठाकर जमातीसाठी क्षेत्र बंधन संपुष्टात आणणारा संसदेचा सुधारित कायदा नंबर १०८/७६, १९३३, १९४२, १९५० या ब्रिटिश सरकार व भारत सरकारच्या आदेशामध्ये अनुसूचित जमात असलेल्या ठाकूर जमातीला १९५६ च्या फेरबदल कायद्यातही अनुसूचित जमात म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते. मात्र क्षेत्र बंधन घातल्याने अनुसूचित क्षेत्राबाहेरील ठाकूर अनुसूचित जमातीच्या लाभांपासून वंचित राहिले. अनुसूचित क्षेत्रातील व क्षेत्राबाहेर राहणाऱ्या एका जमातीसाठी भेदभाव झाल्याने ठाकूर जमात पंचायतीच्या पंचांनी शासनाकडे याबाबत पाठपुरावा सुरू केला. ठाकूर समाजाच्या पंच मंडळींनी आपले म्हणणे केंद्रसरकारच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांना पुराव्यानिशी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले. या पुरावा यांबाबत केंद्र

शासनाने राज्य सरकारकडून खातरजमा करून घेतल्यानंतर महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे केलेल्या शिफारशीनुसार संसदेने घटनेचा सुधारित कायदा नंबर १०८/७६ हा १९७६ साली मंजूर करून संपूर्ण महाराष्ट्र करता ठाकूर जमातीस अनुसूचित जमात म्हणून मान्यता देण्यात आली.

भारत सरकारचे गॅझेट क्रमांक ४४ दिनांक १९ मे १९७६ पत्र क्रमांक ९२२ वर कायदा नंबर १०८/७६ ची उद्दिष्टे आणि कारणांचे विवेचन करताना निवेदन केले आहे की अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचा आदेशानुसार काही जाती-जमातींना राज्यातील काही विशिष्ट भागातच मान्यता दिली आहे. म्हणून या जाती-जमातींच्या सभासदांना जेथे अशी मान्यता नाही तेथे राहात असल्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. हा कायदा सर्वसाधारणपणे अशी क्षेत्र बंधने काढून टाकण्यासाठी करण्यात येत आहे. (१२ मे १९७६ के. ब्रह्मानंद रेड्डी)

**महाराष्ट्रातील अधिवास**

ठाकर समाज महाराष्ट्रात प्रामुख्याने सह्याद्रीच्या पर्वत रांगा सातपुडा पर्वत रांगा अजिंठा डोंगर व कोकणच्या काही भागात वास्तव्यास आहे.१९२८ मध्ये ब्रिटिश शासनाने मागासलेल्या जमातींचे अवलोकन करण्याकरिता स्टार्ट कमिशन ची स्थापना केली होती. या कमिशन च्या परिशिष्ट २ मध्ये २६ क्रमांकावर आदिम व डोंगरी जमातीत २६ क्रमांकावर ठाकर ही जमात वर्गीकृत आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम ३४२ अन्वये अनुसूचित जमातींची राज्य निहाय यादी प्रसिद्ध केली आहे. यात महाराष्ट्रातील ४७ (आता ४५) जमातीपैकी ठाकर ही जमात ४४ व्या क्रमांकावर वर्गीकृत केलेली आहे.

ठाकर जमात ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यातील २६ तालुक्यात कमी अधिक प्रमाणात आढळून येते.

अहमदनगर – अकोला, राहुरी, संगमनेर

रायगड – कर्जत, पेन, पनवेल, माथेरान

पुणे – आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ

नाशिक – इगतपुरी, सिन्नर, नाशिक
ठाणे – ठाणे, कल्याण, मुरबाड, भिवंडी, वाडा, शहापूर, पालघर, मोखाडा, जव्हार.

याशिवाय धुळे, जळगाव, नांदेड, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये ही ठाकर यांचे अस्तित्व अल्प प्रमाणात आढळून येते.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात ठाकर समाज वास्तव्यास असून त्यांच्या जवळपास २८ वस्त्या तालुक्याच्या मध्य भागात विखुरलेल्या आढळून येतात. इतर आदिवासी समुदाय प्रमाणे ठाकर समाजाची फार अशी गावे अस्तित्वात नाही हा समाज प्रामुख्याने मुख्य गावापासून जवळ वाडी–वस्तीवर समूहाने राहतात आहे.

**ठाकर जमातीसाठी क्षेत्र बंधन संपुष्टात आणणारा संसदेचा सुधारित कायदा नंबर १०८/७६**

१९३३, १९४२, १९५० या ब्रिटिश सरकार व भारत सरकारच्या आदेशामध्ये अनुसूचित जमात असलेल्या ठाकूर जमातीला १९५६ च्या फेरबदल कायद्यातही अनुसूचित जमात म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते. मात्र क्षेत्र बंधन घातल्याने अनुसूचित क्षेत्राबाहेरील ठाकूर अनुसूचित जमातीच्या लाभांपासून वंचित राहिले. अनुसूचित क्षेत्रातील व क्षेत्राबाहेर राहणाऱ्या एका ज'ातीसाठी भेदभाव झाल्याने ठाकूर जमात पंचायतीच्या पंचांनी शासनाकडे याबाबत पाठपुरावा सुरू केला. ठाकूर समाजाच्या पंच मंडळींनी आपले म्हणणे केंद्रसरकारच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांना पुराव्यानिशी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले. या पुरावा यांबाबत केंद्र शासनाने राज्य सरकारकडून खातरजमा करून घेतल्यानंतर महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे केलेल्या शिफारशीनुसार संसदेने घटनेचा सुधारित कायदा नंबर १०८/७६ हा १९७६ साली मंजूर करून संपूर्ण महाराष्ट्र करता ठाकूर जमातीस अनुसूचित जमात म्हणून मान्यता देण्यात आली.

भारत सरकारचे गॅझेट क्रमांक ४४ दिनांक १९ मे १९७६ पत्र क्रमांक ९२२ वर कायदा नंबर १०८/७६ ची उद्दिष्टे आणि कारणांचे विवेचन करताना निवेदन केले आहे की अनुसूचित जाती व अनुसूचित ज'तींचा आदेशानुसार काही जाती-जमातींना राज्यातील काही विशिष्ट भागातच मान्यता दिली आहे. म्हणून या जाती-जमातींच्या सभासदांना जेथे अशी मान्यता नाही तेथे राहात असल्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. हा कायदा सर्वसाधारणपणे अशी क्षेत्र बंधने काढून टाकण्यासाठी करण्यात येत आहे. (१२ मे १९७६ के. ब्रह्मानंद रेड्डी)

## ठाकर समाजाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये

१. ठाकर समाजाची विशिष्ट अशी बोलीभाषा असून त्यामध्ये म या शब्दाचा उच्चार मोठ्या प्रमाणात आढळून येतो. सर्वसाधारणपणे घरात बोलताना ठाकरी भाषेचा वापर केला जातो तर इतरत्र मराठी भाषेचा वापर केला जातो.

२. कुटुंबात स्त्रियांना मानाचे स्थान असते कुटुंबाच्या निर्णयप्रक्रियेत स्त्रीयांचा सहभाग असल्याचे दिसून येते. कामाच्या बाबतीतही स्त्री पुरुष सारख्याच प्रकारची कामे करतात

३. पूर्वी पुरुष लंगोटी बंडी धोतर असा पेहराव करायचे तर स्त्रीया गुडघ्यापर्यंत लुगडे चोळी व फडकी अशा प्रकारचा पोशाख परिधान करायची. आता तरुण मुले पॅन्ट शर्ट तर मुली पंजाबी ड्रेस जीन्स टी-शर्ट अशा प्रकारचे कपडे घालताना दिसून येतात.

४. हा समाज स्वच्छंदी असून माणसांना आपल्या मर्जीप्रमाणे वागायला आवडते. शिकार करणे जंगलात भटकणे, खेकडे मासे पकडणे, गलोर घेऊन पक्षी मारणे, रान भाज्या कंदमुळे व वनौषधी अशा अनेक गोष्टी माणसे तासन्तास रमलेली आपल्याला दिसून येतात.


५. या समाजात मुला मुलींची लग्न लवकर होतात व लग्न झाल्यानंतर शक्यतो मुलगा कुटुंबापासून विभक्तपणे राहतो.

## आंबेगाव तालुक्याची भौगोलिक माहिती

पुणे जिल्ह्याच्या उत्तरेला आंबेगाव तालुका आहे. तालुक्याच्या पश्चि' भागात डिंभे धरण आहे. तालुक्याच्या पूर्वेस शिरूर तालुका , पश्चिमेस ठाणे जिल्हा, दक्षिणेस खेड तालुका, उत्तरेस जुन्नर तालुका असून आंबेगाव तालुक्याचे क्षेत्रफळ ४०१५ चौरस किलोमीटर आहे. आहुपे हे तालुक्यातील सर्वात उंचीवरचे गाव असून त्याची समुद्र सपाटीपासूनची उंची २७०० फूट आहे. तालुक्याचे महत्व भारतातील १२ ज्योतिलिंगापैकी पवित्र क्षेत्र श्री भिमाशंकर हे खेड आणि आंबेगावच्या सीमेवर पसरलेले आहे. आंबेगाव तालुक्यातून वाहणाऱ्या घोडनदीवर कुकडी प्रकल्पांतर्गत 'हुतात्मा बाबू गेनू जलाशय' डिंभे हे धरण उभारले आहे. आंबेगाव तालुक्यास निसर्गाचे वरदान लाभले आहे . अनेक पशुपक्षी औषधी वनस्पती येथे आढळतात. भिमाशंकर अभयारण्यात 'शेखरू' ही उडती खार ( दुर्मिळ प्रजाती ) याच तालुक्यात आढळतो. सहयाद्रीच्या घाटमाथ्यावर आंबेगाव तालुका आहे. डोंगरी भागात उगवणारी अनेक झाडे , वेली , फुले , रानवृक्ष आयुर्वेदिक झाडे या भागात आहेत . या तालुक्यातील जंगल राखीव ठेवले आहे . जंगलाखालील क्षेत्र ६२ चौरस मैल आहे. या भागातून घोड नदी वाहते . पुढे ती भीमा नदीला मिळते. अशा रीतीने सह्याद्रीवर पडणारा पाऊस घोडनदीद्वारे आंबेगाव तालुक्यास येऊन मिळतो. भौगोलिक स्थिती भौगौलिक पार्श्वभूमीचा विचार केला तर ह्या भागातील सरासरी उंची १००० ते १२०० मीटरच्या दरम्यान आहे. घोड प्रमुख नदी असुन तिला बुब्रा व नंदा या दोन उपनद्या मिळतात. महसुली गावांची संख्या १३८ आहे. तालुक्यातील एकूण लागवडी खालील क्षेत्र १७२९४ हेक्टर आहे. तालुक्याचे सरासरी तापमान ३२ से.ग्रे ते २७ से.ग्रे इतके आढळते. मान्सून प्रकारचे हवामान आहे. ८०० मीलीमीटर पेक्षा जास्त पाऊस पडतो .

आदिवासी म्हटले कि, आपल्या कुणालाही डोंगर दऱ्या, जंगल आणि दळणवळणाच्या कोणत्याच सोयी- सुविधा आजही न पोहचलेला भाग

दिसतो. आंबेगाव तालुक्यातील बहुंताश ठाकर जमातींचे जिथे वास्तव्य आहे, असा सर्व भाग हा डोंगराच्या पायथ्याचा आहे. मात्र, अजूनही या ठिकाणी दळणवळणाच्या सोयी सुविधांचा म्हणावा तसा विकास झालेला नाही. आंबेगाव तालुक्यातील २८ ठाकर वस्त्यांपैकी १३ वस्त्या या अभ्यासासाठी निवडल्या आहेत. या सर्व वस्त्या तालुक्याच्या मध्य भागातील गावांमध्ये व नदीपासूनजवळ डोंगराच्या पायथ्या जवळ वसलेल्या




१.२ अभ्यासासाठी निवडलेल्या १३ गावांचा नकाशा

## लोकसंख्या


आंबेगाव तालुक्यात महादेव कोळी, ठाकर, कातकरी या तीन आदिवासी जमाती आढळतात. महाराष्ट्रात मुख्यत: १४ जिल्ह्यात आदिवासींचे वास्तव्य आहे. विदर्भातील गडचिरोली, चंद्रपुर, यवतमाळ, नांदेड, नागपुर, गोंदिया, भंडारा आणि अमरावती (गोंडवाना विभाग) हे जिल्हे, तर खानदेशातील धुळे, नंदुरबार, जळगाव, तसेच नाशिक, ठाणे

आणि रायगड (सह्याद्री विभाग) हे जिल्हे मुख्यत: आदिवासी जिल्हे म्हणूनच ओळखले जातात. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२३ कोटी असून त्यापैकी १.०५ कोटी लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्या पैकी अंदाजे ७.८८ लाख ठाकर समाजाची आहे. राज्यातील एकूण आदिवासींच्या ५.४० % एवढी या जमातीची लोकसंख्या आहे. पुणे जिल्हात आदिवासी लोकसंख्या ३.४९ लाख असून त्यात ठाकर समाजाची लोकसंख्या ही सुमारे ८४ हजाराच्या आसपास आहे. पुणे जिल्ह्यातील एकुण आदिवासी समाजाचा विचार करता एकूण लोकसंख्येत ठाकर समाजाचा वाटा २४ टक्क्यांच्या आसपास आहे . महाराष्ट्राचा लोकसंख्या वाढीचा दर १५.९९ % असुन ठाकर समाजातीत हे प्रमाण १८ % पेक्षा जास्त आहे. पुणे जिल्हात आदिवासी लोकसंख्या ३.४९ लाख असून त्यात ठाकर समाजाची लोकसंख्या ही सुमारे ८४ हजाराच्या आसपास आहे. पुणे जिल्ह्यातील एकुण आदिवासी समाजाचा विचार करता एकूण लोकसंख्येत ठाकर समाजाचा वाटा २४% आसपास आहे. महाराष्ट्राचा लोकसंख्या वाढीचा दर १५.९९ % असुन ठाकर समाजात हे प्रमाण १८ % पेक्षा जास्त आहे. इतर आदिवासी समुदाया प्रमाणे ठाकर सूजाची फार अशी गावे अस्तित्वात नाहीत. हा समाज प्रामुख्याने मुख्य गावापासून जवळ वाडी-वस्तीवर समूहाने राहत आहे.

**शिक्षण**

शिक्षण हा घटक कोणत्याही समाजाच्या सामाजिक-अर्थिक, राजकीय सांस्कृबिक विकासात अत्यंत महत्वाची भूमिका बजावतो. शिक्षणाचे असणारे प्रमाण यारून त्या समाजाचा सर्वांगीण विकास किती प्रमाणात झाला आहे हे समजते. सर्वसाधारणपणे ठाकर जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असलेले पहावयास मिळते. आदिवासी निवासी आश्रमशाळा, शिक्षण हक्क कायदा -२००९ यामुळे या समाजाचे प्राथमिक - माध्यमिक शिक्षणातील प्रमाण वाढत आहे. मात्र, पुढे उच्च शिक्षणात हे प्रमाण

अल्प आहे. यामध्ये मुलींचे प्रमाण मात्र अजूनही अत्यल्प आहे. आदिवासी निवासी आश्रमशाळा आणि आदिवासी विभागाच्या वतीने चालवली जाणारी





निवासी वसतिगृहे यात महत्वाची भूमिका बजावताना दिसत आहेत. तालुक्यात शैक्षणिक संस्थांचा विकास झाल्यामुळे आणि आदिवासी विकास विभागाची निवासी वसतिगृहे यामुळे तालुक्यातील या जमातीच्या मुलां – मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणे शक्य होत आहे. उच्चशिक्षण घेण्यासाठी मात्र या मुलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ठाकर समाजातील मुलांचा स्वभाव स्वच्छंदी असल्याने व घरातून शिक्षणाबाबत जागरुकता नसल्याने मासे, खेकडे पकडणे, शिकरीला जाणे, पक्षी मारणे या छंदामुळे बऱ्याचदा शाळेत रमत नाहीत यामुळे प्राथमिक शिक्षणानंतर शाळा गळतीचे प्रमाण वाढते. तसेच मुलींची लग्न लवकर होतात त्यामुळे मुली उच्च शिक्षणाकडे वळत नाहीत.

## कुटुंबप्रमुख यांचे शिक्षण व व्यवसाय

कुटुंब प्रमुखाचे शिक्षणाचा विचार करता जवळपास ४४ % कुटुंब प्रमुख हे निरक्षर असून ३५ % प्राथमिक तर १७ % माध्यमिक शिक्षण घेतलेले आहेत. उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या अत्यल्प असून ती फक्त ४ % आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पदवी किंवा त्यापेक्षा जास्त घेतलेले एकहीं कुटुंब प्रमुख आढळले नाही.

## प्रमुख व्यवसाय




महाराष्ट्रातील इतर आदिवासी जमातींप्रमाणे ठाकर जमात हि देखील पूर्वी पूर्ण निसर्गावर अवलंबून होती. अन्न, निवारा या गरजा ती निसर्गावर भागवत होती. आज त्यांची उदरनिर्वाहाची साधने बदलली आहेत. आंबेगाव तालुक्यात भूमिहीन व अल्पभूधारक जिरायत शेतकरी कुटुंबे मोठ्या प्रमाणात असल्याने शेतमजुरी करणे हा ठाकर जमातीचा मुख्य व्यवसाय आहे. काही कुटुंबे शेती व पशुपालन देखील करतात बकऱ्या पाळणे, गुरे पाळणे, कोंबड्या पाळणे हे शेतीला पूरक व्यवसाय आहेत. त्याचप्रमाणे जंगलातील फळे,वन उपज विकून उत्पादन मिळवतात. आंबेगाव तालुक्यात सुमारे ७५ % ठाकर कुटुंबे  ही उपजीविकेसाठी शेतमजुरीवर अवलंबून आहेत. २१ % लोक शेतीवर उपजिविका करतात तर फक्त ४ % कुटुंबांना नोकरीपासून उत्पन्न मिळते.

### शेतमजुरी

आंबेगाव तालुक्यात शेती नसणाऱ्या किंवा कमी शेत जमीन असलेला आदिवासी ठाकर लोकांना कुटुंब चालविण्यासाठी मजुरी शिवाय पर्याय नाही. सर्वसाधारण पणे महाराष्ट्रात ठाकर जमातीचे मजूरांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले आहे. आंबेगाव तालुक्यातील ठाकर जमातीचे लोक बागायतदारांकडे शेतमजूर म्हणून काम करतात. जवळपास सर्वच ठाकर-वस्त्यांवर वर्षभर मंजुरांसाठीच्या पीक अप/जीप येजा करत असतात.

टोमॅटोच्या बागा बांधणे, बाजरी काढणे, कांदा काढणे, भुईमुग काढणे या प्रकारचे शेतीमध्ये असेल ते काम चांगल्या पद्धतीने करतात. स्वस्तात व कष्टाळू ठाकर मजूर आपल्या शेतात कायम स्वरुपी मजूर म्हणून राबला पाहिजे असे जमिनदारांचे धोरण आहे . कमी मजूरीमध्ये त्यांच्याकडून जास्त काम करून घेतले जाते. मजूरी करण्यासाठी पुरुषाबरोबर ठाकर स्त्रिया हि असतात, त्यांना कमी मोबदला दिला जातो.

## शेती

आंबेगाव तालुक्यात ठाकर जमातील २१ % कुटुंबांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे असे सर्वेक्षणाच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे. आदिवासी ठाकर जमातीच्या शेतीमधून भात, नाचणी, वरई , गहू , हरभरा, मसूर, बाजरी ही पिके घेतली जात होती. शेतीला पाण्याची सोय असणारे शेतकरी बागायती पिके घेतात परंतु हे प्रमाण कमी आहे. आज करत असलेल्या शेतीमधील नाचणी, वरई हि पिके घेतली जात नाहीत. क्वचितच एखाद्या ठिकाणी हि पिके पाहायला मिळतात. ठाकर जमातीमध्ये मंगळवार व रविवारी हा मोडा असतो, या दिवशी ते शेतामध्ये काम करत नाहीत. आठवड्यातील मंगळवारचा दिवस म्हणजे त्यांच्या देवीचा वार असतो.

आंबेगाव तालुक्यातील ठाकर जमातीचे मुख्य पीक भात आणि नाचणी आहे. काही भागामध्ये पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याच्या शेतीमध्ये बाजरीचे पीक घेतले जाते, काही प्रमाणात बटाटे लावतात. ठाकर जमातीमध्ये एक दुसऱ्याच्या शेतीच्या कामाला मदत करण्याची प्रथा आहे .आदिवासी ठाकर जमातीमध्ये आपले शेतीचे काम पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता दुसऱ्याच्या शेतात काम करतात.

## वाट्याने शेती करणे

आंबेगाव तालुक्यात वाट्याने/ खंडाने शेती करणेहा प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. अनेक ठाकर कुटुंबांकडे जमीन नसल्यामुळे किंवा पडीक व जिरायत जमीन असल्याने स्वतःची अशी चांगली शेतजमीन नाही.

यामुळे दुसऱ्या शेतकऱ्यांच्या शेतात वाट्याने शेती करण्याचा पर्याय अनेक कुटुंबांनी निवडला आहे. यामध्ये भांडवलाचा खर्च वगळता उत्पादन (बाजरीची दहा पोती ती झाली तर मालकाना पाच आणि जमीन कसणाऱ्याला पाच) अर्धे- अर्धेदेणे अपेक्षित असते. कधी कधी शेतकरी कुटुंब चांगले नसल्यास वाट्याने शेती केलेल्या ठाकर कुटुंबांची पिळवणूक होते.

काही आदिवासी ठाकर जमातीची मुले आपल्या वडिलांचे परंपरागात व्यवसाय करतात. उदा. शिकार करणे, खेकडे पकडणे, मासेमारी करणे, पक्षी मारणे, मध जमा करणे, फळे कंदमुळे जमा करणे. गलोलीने नेमबाजी करणे यात ठाकर समाजातील मुले पारंगत आहेत. उडत्या पाखराला टिपण्याचा नेम त्यांच्याकडे असतो. डोंगर चढणे व उतरणे हे त्याचे नित्याचे काम असते. आदिवासी ठाकर लोकांच्या कामातून त्यांचा काटकपणा जास्त दिसतो.

## पशुपालन

आंबेगाव तालुक्यातील ठाकर जमातीचे लोक शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन करतात. पशुपालन करण्याची संख्या हि अत्यल्प आहे. पशुपालानामध्ये तालुक्यात बकऱ्या व कोंबड्या पाळण्याचे प्रमाण जास्त आहे. काही मोजक्याच व्यक्तींकडे दुध व्यवसायासाठी गाई पाळल्या जातात. यातून या कुटुंबांच्या उपजीविकेसाठी हातभार लागतो.

## ठाकर समाजाची सामाजिक आर्थिक माहिती

**निवारा** (घराची व घराच्या खालच्या जमिनीची मालकी)

| घराची मालकी | | | घराखालील जमिनीची मालकी | |
|---|---|---|---|---|
| कुटुंब संख्या | % | | कुटुंब संख्या | % |
| होय | २६६ | ८९.३ | १३६ | ४५.६ |
| नाही | ३२ | १०.७ | १६२ | ५४.४ |
| एकूण | २९८ | १०० | २९८ | १०० |

घराच्या जमिनीचा प्रश्न जवळपास सर्वच वस्त्यांवर गंभीर स्वरूपाचा आहे. सर्वेक्षण झालेल्या कुटुंबयापैकी ९० कुटुंबांकडे स्वत:चे घर असले तरी जवळपास ५५% लोकांकडे घराखालच्या जमिनीची मालकी नाही.ठाकरवाडी सारख्या गावात सर्व कुटुंबांच्या घराखालची जमीन इतर समाजाच्या व्यक्तींच्या मालकीचे आहे. घरांच्या आसपासची जमीन इतर समाजांच्या मालकीची असल्याने कोंबड्या बकरे त्यांच्या शेतात गेल्यास त्रास दिला जातो. अनेकदा शेतातील पाऊलवाटेचा वापर करू दिला जात नाही तसेच काही जमीन मालक त्याचा राजकारणासाठी वापर करतात व त्यातून संघर्ष झाल्यास या समाजाची पिळवणूक केली जाते. पूर्वजांनी घराखालच्या जमिनीचे व्यवहार केले होते परंतु अनेकदा शिक्षण न घेतल्याने त्यांनी तोंडी व्यवहार केले व त्यामुळे आता त्यांच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही

### जमिनीची मालकी व जमीन धारणा क्षेत्रानुसार वर्गवारी

सर्वे केलेल्या एकूण २९८ कुटुंबांपैकी १२१ (४०%) कुटुंबे ही भूमीहीन असून १७७ (६०%) कुटुंबांकडे जमीन आहे. या १७७ कुटुंबापैकी १४८ कुटुंबांना एक हेक्टरपेक्षा कमी जमीन असून ती प्रामुख्याने जिरायत आहे. कुटुंबांकडे असणाऱ्या एकूण जमिनीपैकी ९० % जमीन ही जिरायत असून ७.५ % जमीन पडीक आहे उर्वरित अडीच % जमीन बागायत आहे. त्यामुळे अर्थातच या लोकांचा उपजीविकेचा कल हा शेतमजूरीकडे आहे.




| गावाचे नाव | | मालकीची जमीन | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| आमोंडी | कुटुंबसंख्या<br>% | १८<br>४१.९% | २५<br>५८.१% | ४३<br>१००.०% |
| चास | कुटुंबसंख्या<br>% | २६<br>५९.१% | १८<br>४०.९% | ४४<br>१००.०% |
| शिनोली | कुटुंबसंख्या<br>% | ४७<br>६५.३% | २५<br>३४.७% | ७२<br>१००.०% |
| महाळुंगे पडवळ | कुटुंबसंख्या<br>% | २१<br>७५.०% | ७<br>२५.०% | २८<br>१००.०% |
| गंगापूर खु. | कुटुंबसंख्या<br>% | १७<br>७०.८% | ७<br>२९.२% | २४<br>१००.०% |
| कोलदरे | कुटुंबसंख्या<br>% | १६<br>६९.६% | ७<br>३०.४% | २३<br>१००.०% |
| उगलेवाडी | कुटुंबसंख्या<br>% | ११<br>९१.७% | १<br>८.३% | १२<br>१००.०% |
| घोडेगाव | कुटुंबसंख्या<br>% | ८<br>६१.५% | ५<br>३८.५% | १३<br>१००.०% |
| दरेवाडी | कुटुंबसंख्या<br>% | ५<br>५०.०% | ५<br>५०.०% | १०<br>१००.०% |
| लांडेवाडी | कुटुंबसंख्या<br>% | ३<br>३०.०% | ७<br>७०.०% | १०<br>१००.०% |
| ठाकरवाडी | कुटुंबसंख्या<br>% | ४<br>५०.०% | ४<br>५०.०% | ८<br>१००.०% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पिंपळगाव घोडे | कुटुंबसंख्या<br>% | १<br>१६.७% | ५<br>८३.३% | ६<br>१००.०% |
| कळंब | कुटुंबसंख्या<br>% | ०<br>०.०% | ५<br>१००.०% | ५<br>१००.०% |
| **एकूण** | **कुटुंबसंख्या<br>%** | **१७७<br>५९.४%** | **१२१<br>४०.६%** | **२९८<br>१००.०%** |

## सरासरी मासिक उत्पन्न

ठाकर समाजाचा उत्पन्नाचा प्रमुख स्रोत शेतमजुरी हा आहे. नाबार्ड च्या अहवालानुसार भारतात प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न ८०८९ रु तर महाराष्टात ते ८९३८ रु आहे. आंबेगाव तालुक्यातं ठाकर समाजातील कुटुंबात सरासरी मासिक उत्पन्नाचे प्रमाण हे तीन पटीने कमी २३३८ रु. इतके आहे . सध्या मजुरीचा दर २०० रु. इतका आहे व त्यातून ठाकर कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न १८०० ते ३६०० रुपयांच्या दरम्यान आहे. ठराविक कुटुंबांना शेळीपालनाच्या व्यवसायातूनही, मासे, खेकडी यांच्या विक्रीतून थोडेसे अतिरिक्त उत्पन्न मिळते.

| **गावाचे नाव** | **कुटुंबसंख्या** | **कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न** |
|---|---|---|
| आमोंडी | ४१ | २७६८ |
| चास | ४१ | २३४८ |
| शिनोली | ६८ | १९९३ |
| महाळुंगे पडवळ | २६ | २४८१ |
| गंगापूर खु. | २३ | १९०९ |
| कोलदरे | २३ | २८७० |
| उगलेवाडी | ११ | २२२७ |


| | | |
|---|---|---|
| घोडेगाव | १३ | २५०० |
| दरेवाडी | १० | १८०० |
| लांडेवाडी | १० | २३०० |
| ठाकरवाडी | ८ | २१८८ |
| पिंपळगाव घोडे | ६ | २१६७ |
| कळंब | ५ | ३६०० |
| **एकूण** | **२८५** | **२३३८** |

**घरातील प्रमुख कागदपत्रांची उपलब्धता**

आंबेगाव तालुक्यात ठाकर समाजातील बहुतांश कुटुंबाकडे रेशन कार्ड, आधार कार्ड, जातीचा दाखला व मतदान कार्ड ही कागदपत्रे असल्याचे सर्वेक्षणात दिसून आले आहे. मात्र जवळपास ८२ % लोकांकडे जॉब कार्ड नाही. तर आयुष्यमान भारत कार्ड ८० % लोकांकडे नाही. या दोन्ही योजनांची माहिती जवळपास सर्वच वस्त्यात मधील लोकांना माहीत नाही. जवळपास ४० % कुटुंबांकडे पॅनकार्ड असल्याचे दिसून आले विविध योजनांसाठी बँकेत खाते उघडावे लागत असल्याने या कुटुंबांनी पॅन कार्ड काढून घेतली आहेत. विविध संस्था, संघटनांनी (विशेषत: किसान सभेने) ठाकर वस्त्यापर्यंत विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मेहनत घेतल्याने या तीन चार कागदपत्रांबाबत समाधान कारक स्थिति दिसून आली मात्र जॉब कार्ड व आयुष्यमान भारत योजनेची कागदपत्रे लोकांकडे कमी प्रमाणात आढळून आली. जवळपास निम्म्या या लोकांकडे बीपीएल कार्ड नाही.

| कागदपत्रे | | शासकीय कागदपत्रे | | Total |
|---|---|---|---|---|
| | | आहे | नाही | एकूण |
| बीपीएल यादीत नाव | कुटुंबसंख्या | १५१ | १४७ | २९८ |
| | % | ५०.७% | ४९.३% | १००.०% |
| रेशन कार्ड | कुटुंबसंख्या | २८४ | १४ | २९८ |
| | % | ९५.३% | ४.७% | १००.०% |
| आधार कार्ड | कुटुंबसंख्या | २९७ | १ | २९८ |
| | % | ९९.७% | ०.३% | १००.०% |
| जातीचा दाखला | कुटुंबसंख्या | २६३ | ३५ | २९८ |
| | % | ८८.३% | ११.७% | १००.०% |
| मतदान कार्ड | कुटुंबसंख्या | २७४ | २४ | २९८ |
| | % | ९१.९% | ८.१% | १००.०% |
| जॉब कार्ड | कुटुंबसंख्या | ५२ | २४६ | २९८ |
| | % | १७.४% | ८२.६% | १००.०% |
| पॅन कार्ड | कुटुंबसंख्या | १८० | ११८ | २९८ |
| | % | ६०.४% | ३९.६% | १००.०% |
| आयुष्यमान भारत कार्ड | कुटुंबसंख्या | ५८ | २४० | २९८ |
| | % | १९.५% | ८०.५% | १००.०% |

## वीज, गॅस व रॉकेल सुविधा



| सुविधा | | एकूण | |
|---|---|---|---|
| | | कुटुंबसंख्या | % |
| गॅस आहे ? | होय | २३३ | ७८.२% |
| | नाही | ६५ | २१.८% |
| | **एकूण** | **२९८** | **१००.०%** |
| गॅस मिळालेली योजना | उज्वला योजना | १७६ | ५९.१% |
| | वन विभाग | ५ | १.७% |
| | लागू नाही | ११७ | ३९.३% |
| | **एकूण** | **२९८** | **१००.०%** |
| रॉकेल मिळते ? | होय | २५ | ८.४% |
| | नाही | २७३ | ९१.६% |
| | **एकूण** | **२९८** | **१००.०%** |

सर्वे केलेल्या जवळपास ७८ % कुटुंबांकडे गॅस आहे . ६० %कुटुंबांना गॅस उज्वला योजनेतून मिळाला असून वनविभागाकडून फक्त २ % कुटुंबांना गॅस दिला गेला आहे. ६७% कुटुंबांकडे विजेचे कनेक्शन आहे तर ३३% लोकांकडे अद्यापही वीज कनेक्शन नाही. जवळपास ९२ % कुटुंबांना रॉकेल मिळत नाही असे दिसून आले आहे. त्यामुळे रॉकेलचा प्रश्न या वस्त्यांवर ती अतिशय गंभीर आहे. स्वयंपाकासाठी गॅस नसलेल्या २० % व घरात उजेडा-साठी वीज नसलेल्या २४ % कुटुंबांना याचा फार मोठा फटका बसत आहे.

## मूलभूत सुविधा बाबतच्या समस्या.

बहुतांश वस्त्यावर पिण्याच्या पाण्याची अडचण आहे. वस्तीवर जाण्यासाठी कच्चे रस्ते आहेत पण पक्के रस्ते नाहीत शिनोली येथील चिंचेची वाडी येथे इतर समाजातील लोक रस्त्याला जागा देत नाहीत असेच प्रकार इतरही वस्त्यांमध्ये दिसून आले.

**मूलभूत सुविधांबाबतच्या समस्या**

| प्रमुख समस्या | | कुटुंबसंख्या | % |
|---|---|---|---|
| पिण्याच्या पाण्याची समस्या | होय | २६२ | ८७.९% |
| | नाही | ३६ | १२.१% |
| | एकूण | २९८ | १००.०% |
| रस्त्याची समस्या | होय | १९७ | ६६.१% |
| | नाही | १०१ | ३३.९% |
| | एकूण | २९८ | १००.०% |
| आंगणवाडीच्या समस्या | होय | २६९ | ९०.३% |
| | नाही | २९ | ९.७% |
| | एकूण | २९८ | १००.०% |
| स्मशांनभूमीची समस्या | होय | २८१ | ९४.३% |
| | नाही | १७ | ५.७% |
| | एकूण | २९८ | १००.०% |

अनेक वस्त्यांवर स्मशानभूमीची सुविधा नाही. विविध प्रकारचे विकास कामे करताना ठाकर वस्ती यांना प्राधान्य दिले जात नाही.

**प्रमुख निरीक्षणे व सूचना**

१) आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजात भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण ४० % असून, अल्पभूधारकांचे प्रमाण ५०% आहे. एकूण उपलब्ध जमिनी पैकी ९७.५० % जमीन ही जिरायत व पडीक असल्याने येथील ७५% लोक हे उपजीविकेसाठी शेतमजुरीवर अवलंबून आहेत. या कुटुंबांच्या उदरनिर्वाहासाठी रोजगार हमी योजनेसारख्या मजूर प्रधान योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

२) ठाकर समाजात शिक्षणाचे प्रमाण अजूनही कमी असून जवळपास कुटुंबांचा साक्षरता दर ५६ % असून तो राज्याच्या ६५% पेक्षा ९ % ने कमी आहे . फक्त ४ % कुटुंबप्रमुखांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतल्याचे दिसून आले आहे. ठाकर समाजातील मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

३) कुटुंबांचे सरासरी मासिक उत्पन्न देशाच्या व राज्याच्या सरासरीपेक्षा तीन पटीने कमी म्हणजे २३३८ रुपये इतके आहे. शेळीपाळन, मासेमारी व लहान स्वरूपातील कुकुटपालन यासारख्या व्यवसायांसाठी या कुटुंबांना आर्थिक सहाय्य देऊन प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. ठाकर समाजात औषधी वनस्पतींचे ज्ञान मोठ्या प्रमाणात असून ते जतन करणे गरजेचे आहे. या औषधाना बाजारपेठ उपलब्ध झाल्यास त्यातून त्याना उत्पन्न मिळू शकते.

४) ९० % कुटुंबांना स्वताच्या मालकीचे घर असले तरी त्यापैकि ५४ % कुटुंबांच्या घराखालच्या जमिनी ह्या इतर समाजातील लोकांच्या मालकीच्या आहेत. त्यामुळे अशा कुटुंबात घराच्या जमिनीवरून कायम चिंतेचे वातावरण असते. अनेकदा यावरून वादही होतात. प्रशासनाने याबाबत लक्ष घालून या जमिनी संबंधित घरामालकांच्या नावे होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

५) रोजगार हमी योजना व आयुष्यमान भारत योजना याविषयी लोकांना माहिती नाही. जवळपास ८० % लोकांकडे **जॉब कार्ड नाहीत.** त्यामुळे या मजुरीवर अवलंबून असणाऱ्या समाजाला त्यांच्या कायदेशीर हक्कापासून वंचित ठेवले जात आहे. या कुटुंबाना जॉब कार्ड देण्याची व्यवस्था प्रशासनाने करणे अपेक्षित आहे व यासोबतच शासकीय योजनांची सखोल माहिती देणे आवश्यक आहे.

६) रॉकेलचा प्रश्न गंभीर असून ९१ % कुटुंबांनी ते मिळत नसल्याचे नमूद केले आहे.

७) पिण्याचे पाणी, रस्ते, स्मशानभूमी याविषयी लोकांना अनेक समस्या आहेत व त्यांनी त्या नोंदविल्या आहेत. अनेक वस्त्यांवर अजूनही जायला रास्ते नाहीत. पिण्यासाठी पाणी नाही. मयत पुरण्यासाठी किंवा जाळण्यासाठी स्मशानभूमीची सोय नाही. या सुविधा उपलब्ध होण्यासाठी ग्रामपंचायत. पंचायत समिती, व जिल्हा परिषद स्तरावरून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

❑❑❑

## प्रतिक्रिया

''प्रशासन व लोक प्रतिनिधी यांच्या दुर्लक्षपणामुळे आदिवासी ठाकर जमात ही पूर्वीपासूनच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्याचा सोयीपासून वंचित राहिलेली आहे. या संशोधन अभ्यासातून आपल्याला ठाकर समाजाची सद्यस्थिती काय? याचे आकलन होते. या संशोधन अभ्यासाचा आपल्याला या जमातीच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे? यासाठी शासनाला व स्थानिक सामाजिक संस्था, संघटना यांना उपयोग होईल. या संशोधन अभ्यास प्रकल्पात प्रत्यक्ष अभ्यास करून सद्यस्थितीची मांडणी केली आहे ही मांडणी अतिशय मार्मिक शब्दांत केली आहे.''

– **प्रा.युवराज काळे**, ठाकरवाडी,चास ता.आंबेगाव जि.पुणे
(सहाय्यक प्राध्यापक, गुलाम नबी आझाद आर्ट,कॉमर्स व सायन्स कॉलेज, बार्शिटाकळी, अकोला)

''जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यांत तुरळक वस्ती करून राहणाऱ्या आदिवासी समाजातील ठाकर जमात ही एक प्रमुख जमात आहे. माझा जन्म देखील या जमातीमध्ये झालेला आहे. ठाकर जमातीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा ङ्गसंस्कृतीफआढळत असूनही ही जमात आजच्या घडीला शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासापासून वंचित राहिली आहे. या जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रमुख कोणकोणत्या समस्या आहेत, या बद्दलचे स्पष्टीकरण या अहवालात खूप चांगल्या प्रकारे केले आहे. या अहवालाचा उपयोग या समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी होईल. मी या अहवालाच्या निर्मितीसाठी मेहनत घेणाऱ्या सर्वांना माझ्या व समाजाच्या वतीने धन्यवाद देतो.''

– **प्रा. पप्पू दगडू काळे**, गोळेगाव ता. जुन्नर जि. पुणे
(सहाय्यक प्राध्यापक, रयत शिक्षण संस्था, सांगली)

''आदिम संस्थेने तयार केलेला आंबेगाव तालुक्यातील ठाकर समाजाचा अहवाल अत्यंत चांगला व वस्तुनिष्ठ आहे. हा अहवाल वाचताना मला मनापासून आनंद झाला. दुर्लक्षित असणाऱ्या आदिवासी ठाकर समाजाच्या व्यथा आकडेवारीच्या आधारे या अहवालात मांडल्या आहेत. या अहवालामुळे शासनाला ठाकर समाजाच्या नेमक्या समस्या कळतील व त्यावर उपाययोजना करणे शक्य होईल अशी मला अपेक्षा आहे.''

**– अजित अनिल पारधी**, तांबे ता.जुन्नर जि.पुणे
(विद्यार्थी (बी.पी.एड), चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय पुणे)

''आदिवासी जमातीवर संशोधन करताना असे दिसून येते कि, ठाकर व कोळी महादेव यांचे जवळचे सबंध आहेत. त्यामुळे ठाकर जमात जवळून पाहिली आहे. आदिम संस्थेने तयार केलेल्या अहवालानुसार ठाकर जमातीच्या लोकांना कंदमुळे व वनौषधींची माहिती व ज्ञान असल्याने त्यांच्या माहितीच्या आधारे मानवी जीवनातील व प्राणी जगतातील विवीध आजारावरील औषधांसाठी त्यांच्या ज्ञानाचा समाजाला उपयोग होऊ शकतो.तसेच ठाकर जमात ही (शिकार करण्यात) गलोरी चालवण्यात अचूक वेध घेण्यात अव्वल असल्याने राष्ट्रीय खेळाडू तयार करण्यासाठी त्यांच्या क्षेत्रात क्रीडा संकुल तयार केल्यास अव्वल दर्जाचे राष्ट्रीय खेळाडू तयार होऊ शकतील. त्यासाठी ठाकर जमातीचे प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. जे ठाकर भूमीहीन आहेत, त्यांना सरकारी योजनाची माहिती देऊन त्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळवून दिल्या पाहिजेत. आदिम संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचा ठाकर जमातीचे जीवन सुधारणेसाठी निश्चित उपयोग होईल.''

**– सौ. सुमन ज्ञानेश्वर बगाड**, धामनखेल,ता. जुन्नर, जि. पुणे.
(पीएचडी संशोधक व मुख्याध्यापिका बॅ. विठ्ठलराव गाडगीळ प्राथ. शाळा विश्रांतवाडी, मनपा शाळा क्र. ११८ बी )

□□□

## आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र

सन २०१२ पासून आदिवासी बोलीभाषा,संस्कृती यावर संशोधन व्हावे,यासोबतच आदिवासी, दलित शोषित वर्ग यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास व संशोधन करणे. यातून समोर आलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काम करणे हा मूळ हेतू समोर ठेवून आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र ही स्वतंत्र सामाजिक संस्था कार्यरत आहे.

### संपर्क

आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र
त्रिमूर्ती भवन, जुन्नर फाटा, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे – ४१२४०८
फोन : ८०५५५०८२८० / ९४०४२३८७७३ / ९१६८१९२८२३
ई–मेल : adimsanstha2012gmail.com
वेबसाईट : https://adimresearch.org/

### संस्थेच्या वतीने प्रकाशित पुस्तके

- 'आदिवासी काल, आज आणि उद्या' (संपादित पुस्तक) – संपादक– डॉ. अमोल वाघमारे
- सपान (काव्यसंग्रह) – प्रा. डॉ. हनुमंत भवारी
- पुणे जिल्ह्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांचा अभ्यास – प्रा.डॉ. कविता वरे
- पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) कायदा – १९९६ (पेसा) अंमलबजावणी विषयक अभ्यासाचा अहवाल – नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज (NCAS) व आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र